पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १७

**सभावृत्तांत**

दिनांक - **०९/०१/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **०९/०१/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.संतोष बबन कांबळे

२. मा.गीता सुशिल मंचरकर

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

सभाकामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने उपस्थित सन्मा सदस्यांनी **मंगळवार** दिनांक **२३/०१/२०१८** रोजी दुपारी **२.४५** वा.पर्यंत तहकूब केली.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १७

**सभावृत्तांत**

**(** दि. ०९/०१/२०१८ ची तहकूब सभा **)**

दिनांक - **२३/०१/२०१८** वेळ - दुपारी **२.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची दिनांक **०९/०१/२०१८** ची तहकूब सभा **मंगळवार** दिनांक **२३/०१/२०१८** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सागर बाळासाहेब गवळी - सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.गीता सुशिल मंचरकर
६. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पाठक, मा.सिनकर – उप अभियंता, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक - २८/११/२०१७, ३०/११/२०१७, १२/१२/२०१७ व २६/१२/२०१७ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १५)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक - १२/१२/२०१७ व २६/१२/२०१७ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १६)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ४३ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २३/०१/२०१८ विभाग – नगररचना
सुचक : मा.संतोष कांबळे अनुमोदक : मा.शशिकांत कदम
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/१८/कावि/१७३/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय – मौजे किवळे स.नं.३९ ते ७१ येथील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी.रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४४ विषय क्रमांक - ०२
दिनांक - २३/०१/२०१८ विभाग – नगररचना
सुचक : मा.शशिकांत कदम अनुमोदक : मा.संतोष कांबळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/१८/कावि/१७४/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय – मौजे किवळे स.नं.७३, ७४, ७५ व ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४५ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २३/०१/२०१८ विभाग – नगररचना

सुचक : मा.अश्विनी वाघमारे अनुमोदक : मा.शशिकांत कदम

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५

विषय - पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.०० मी. रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी.हद्दीपर्यंत स.नं.१५ पै.व स.नं.१४ पै.मधील २४ व १२ मी.रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे भूसंपादनाबाबत.

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४६ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २३/०१/२०१८ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक : मा.शशिकांत कदम अनुमोदक : मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/८०८/२०१७, दि.२६/१२/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिलिंदनगर झोपडपट्टीमध्ये पुनर्वसन झालेल्या इमारतीसाठी आर.सी.सी.सिमाभिंत बांधणे या कामाबाबत मा.आमदार व स्थनिक नगरसदस्य यांनी मागणी केली आहे. सदरहु काम अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत शासनाकडून जमा झालेल्या ररु.३५० लक्ष या अखर्चित निधीतून करावयाचे आहे. पिंपरी मिलिंदनगर झोपडपट्टीमध्ये पुनर्वसन झालेल्या इमारतीसाठी आर.सी.सी.सिमाभिंत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून त्याची अंदाजपत्रकीय र.रु.४०,००,०००/- (अक्षरी र.रु.चाळीस लाख फक्त) इतकी येत आहे. तरी सदर कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील (प्रभाग क्र.९) येथे यशवंतनगर ही घोषित झोपडपट्टी गेली ३० ते ३५ वर्षापासून वसलेली आहे. तसेच तेथील सर्व झोपडपट्टीधारकांनी अनेकवेळा पुनर्वसनाची मागणी केलेली आहे. परंतु सदर झोपडपट्टीची जागा ही ओपन स्पेस असल्याकारणाने त्याजागी बांधकाम करणे शक्य नसलेचे निदर्शनास येत आहे. परंतु झोपडपट्टीधारकांच्या मागणीचा विचार करता एस.आर.ए.नियमाप्रमाणे जवळपासच पुनर्वसन करणे गरजेचे असल्याने यशवंतनगर झोपडपट्टीच्या जवळच असलेल्या महानगरपालिकेच्या आरक्षित जागेवर पुनर्वसन करणे शक्य असल्याने आरक्षण क्र.७९ (बेघरांसाठी घरे) ही जागा पुनर्वसनासाठी योग्य असल्याने सदरची जागा झोपडपट्टी पुनर्वसनासाठी एस.आर.ए. विभागाकडे वर्ग करुन नियमाप्रमाणे सदर झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच झोनिपु विभागाकडील अण्णाभाऊ साठे वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील कामांना प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. या बाबत मा.जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक ०४/१२/२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये मा.पालकमंत्री महोदय (पुणे) यांनी उपरोक्त योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे नमुद केलेल्या कामांचा समावेश करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. **कामाचे नांव** – १) पिंपरी चिंचवड मनपातील मिलिंदनगर झोपडपट्टीमध्ये पुनर्वसन झालेल्या इमारतीसाठी सिमाभिंत बांधणे (अंदाजपत्रकीय र.रु.४०,००,०००/-), २) पिंपरी मिलिंदनगर झोपडपट्टीमध्ये नविन शौचालय बांधणे व परिसरात पेव्हिंगब्लॉक बसविणे.(अंदाजपत्रकीय र.रु.४०,००,०००/-), ३) मिलिंदनगर झोपडपट्टीमध्ये महिला बचतगटासाठी शेड बांधणे.(अंदाजपत्रकीय र.रु.१०,००,०००/-) सदर कामांना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४७ विषय क्रमांक - ०५

दिनांक - २३/०१/२०१८ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक : मा.संतोष कांबळे अनुमोदक : मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/८०९/२०१७, दि.२६/१२/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिलिंदनगर झोपडपट्टीमध्ये नविन शौचालय बांधणे व परिसरात पेव्हिंगब्लॉक बसविणे या कामाबाबत मा.आमदार व स्थनिक नगरसदस्य यांनी मागणी केली आहे. सदरहु काम अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत शासनाकडून जमा झालेल्या र.रु.३५० लक्ष या अखर्चित निधीतून करावयाचे आहे. पिंपरी मिलिंदनगर झोपडपट्टीमध्ये नविन शौचालय बांधणे व परिसरात पेव्हिंगब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून त्याची अंदाजपत्रकीय र.रु.४०,००,०००/- (अक्षरी र.रु.चाळीस लाख फक्त) इतकी येत आहे. तरी सदर कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **सागर बाळासाहेब गवळी** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४३/२०१८
दिनांक : २३/०१/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.